प्र.१ दलित कवितेमधून आंबेडकरवाद आणि मार्क्सवाद या दोहोंचा प्रभाव कसा दिसून येतो ते तुम्ही अभ्यासलेल्या 'कविता शतकाची' या काव्यसंग्रहातील कवितांच्या आधारे सविस्तर लिहा. (१५)

**किंवा**

"सामाजिक बांधिलकी हा 'कविता शतकाची' या काव्यसंग्रहातील कवितांचा मुख्य गाभा आहे." तुम्ही अभ्यासलेल्या कवितांच्या आधारे स्पष्ट करा.

प्र.२ "'कविता शतकाची' या काव्यसंग्रहातील कवितेत भावसौंदर्य आणि वैचारिकता यांचा सुंदर मिलाफ आढळतो." या विधानाचा तुम्ही अभ्यासलेल्या कवितांच्या आधारे साधार परामर्श घ्या. (१५)

**किंवा**

" स्त्रीला आलेली अस्तित्वाची जाग 'कविता शतकाची' या काव्यसंग्रहातील कवितांतून व्यक्त होते" तुम्ही अभ्यासलेल्या कवितांच्या आधारे चर्चा करा.

**प्र.३ खालील सर्व उपप्रश्न सोडवा.**

अ) मुंबईत नव्याने सुरु होणाऱ्या बी.एड् महाविद्यालयाची जाहिरात वृत्तपत्रासाठी तयार करा. (७)

ब) कल्याण - डोंबिवली महानगरपालिकेतील वरिष्ठ लिपिक श्री. सहदेव गायकवाड यांना त्यांच्या डाव्या डोळयावरील शस्त्रक्रियेसाठी चार दिवसांची भरपगारी रजा हवी आहे. गेली पन्नास वर्षे श्री. गायकवाड कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या सेवेत कायमस्वरुपी आहेत. त्यांची वीस दिवसांची भरपगारी रजा शिल्लक आहे. या माहितीच्या आधारे वरिष्ठांना सादर करावयाची कार्यालयीन टिप्पणी लिहा. (८)

क) खालील उताऱ्याचा सुमारे एक-तृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा. (७)

क्रांती म्हणजे समाजजीवनात जाणीवपूर्वक घडवून आणलेला आमूलाग्र बदल होय. म्हणजेच आमूलाग्र बदल हे क्रांतीचे वैशिष्ट्य झाले. क्रांतीचा विचार करताना साहजिकच युद्धाचा विचार येतो. तेव्हा हे प्रकर्षाने जाणवते की, युध्द हा क्रांतीचा एक भाग होऊ शकतो; मात्र क्रांती हा युद्धाचा भाग होऊ शकत नाही. कारण युद्धात राष्ट्रसीमा, राजसत्ता किंवा अंतर्गत कलह यांचा अंतर्भाव होऊ शकतो. पण क्रांती त्यापेक्षा वेगळी आहे. जेव्हा एखादी समाजरचना व्यक्तीवर, जास्त करुन व्यक्ति समूहावर अन्याय करते, त्यांच्या हक्कांची पायमल्ली होते, तेव्हा या अन्यायाविरुध्द समाजात जागृती निर्माण होते.

ड) अण्णा भाऊ साठे महामंडळातील कर्मचारी वर्गाच्या कर्मचारी कल्याण निधी निश्चिती संदर्भातील